**सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ पुणे**
शिवाजीनगर– पुणे , ४११ ००५
**(महाराष्ट्र शासनाचे एकल तंत्रज्ञान विद्यापीठ)**

संपर्क क्र. ०२० २५५० ७०००/०९/५६/५५ Website : www.coeptech.ac.in Email: registrar@coeptech.ac.in

जा.क्र.तंविपु- विद्यापीठ/शिष्यवृत्ती/२०२६ /30 दि. 30/7/2026.

## परिपत्रक

**विषय:** महाडीबीटी 2.0 (Maha DBT2.0) पोर्टलवर सर्व प्रवर्गातील (Categories) विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती (Fee Reimbursement) अर्ज भरण्याबाबत अनिवार्य सूचना.

शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ मध्ये प्रवेश घेतलेल्या **सर्व प्रवर्गातील (SC, ST, OBC, VJNT, SBC, SEBC,EBC/EWS आणि खुला प्रवर्ग राजर्षी शाहू महाराज योजना)** जे विद्यार्थी शासकीय शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क आणि परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती सवलतीसाठी पात्र आहेत, अशा सर्व विद्यार्थ्यांना याद्वारे सूचित करण्यात येते की, शासनाने **Maha DBT 2.0** हे नवीन पोर्टल कार्यान्वित केले आहे. सदर पोर्टलवर ऑनलाइन अर्ज सादर करणे, प्रोफाईल अपडेट करणे आणि कागदपत्रे पडताळणी करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.या संदर्भात सर्व विद्यार्थी आणि पालकांनी खालील नियमांची व अटींची नोंद घ्यावी:

**१ . नवीन 'महाआयडी' (Maha ID) तयार करणे अनिवार्य**

I. सर्व विद्यार्थ्यांना महाडीबीटी पोर्टलवर आधार कार्डचा वापर करून नवीन **Maha ID (Maha IT ID)** तयार करणे बंधनकारक आहे.

II. मागील पोर्टलवरील जुने युझर आयडी (User ID) आणि पासवर्ड (Password) आता चालणार नाहीत.

**२ . आधार लिंक करणे आणि कागदपत्रे अपलोड करणे**

I. विद्यार्थ्यांनी आपला आधार क्रमांक वापरूनच नोंदणी करावी. आधार पोर्टलवर आपली सर्व माहिती जसे की पत्ता, मोबाईल नंबर, ईमेल आणि **बँक खाते (आधार सीडेड/लिंक असलेले)** अचूक व अद्ययावत असावे.

II. सर्व आवश्यक कागदपत्रे (जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, अधिवास प्रमाणपत्र आणि मागील वर्षांचे गुणपत्रक इ.) स्पष्ट आणि वाचता येतील अशा **PDF स्वरूपात** अपलोड करावीत.

III. **नूतनीकरणाचे (Renewal) विद्यार्थी:** विद्यार्थ्यांनी नवीन महाआयडी लॉगिन केल्यानंतर डॅशबोर्डवरील **"माझा अर्ज नूतनीकरण करावा"** या विशिष्ट टॅबचीच निवड करावी.

**I. ३ . आर्थिक जबाबदारी आणि दंडात्मक अट (अत्यंत महत्त्वाचे)**

II. **अर्ज भरणे अनिवार्य:** शिष्यवृत्तीचा अर्ज अचूक भरणे, तो कॉलेज स्तरावरून मंजूर करून घेणे आणि अंतिम मंजुरी मिळेपर्यंत त्याचा पाठपुरावा करणे ही **पूर्णपणे विद्यार्थ्याची वैयक्तिक जबाबदारी** असेल.

**III.** **अर्ज न भरल्यास किंवा नाकारला गेल्यास:** विद्यार्थ्याच्या निष्काळजीपणामुळे, चुकीची माहिती भरल्यामुळे किंवा मुदतीत अर्ज न केल्यामुळे शासनाकडून शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती (Fee Reimbursement) न मिळाल्यास, **संबंधित विद्यार्थ्याला खुल्या प्रवर्गाच्या (Open Category) नियमाप्रमाणे संपूर्ण उर्वरित फी महाविद्यालयात जमा करावी लागेल. पालक व विद्यार्थ्यांची संपूर्ण जबाबदारी:** शासनाकडून फी मंजूर न झाल्यास, महाविद्यालयाची **महत्त्वाचे :- बँक खात्यावर रक्कम जमा झाल्यानंतर फी भरणे :-**

अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर केंद्र किंवा राज्य शासनाचा हिस्सा (शिष्यवृत्ती/फी) थेट जमा (DBT) होतो, अशा विद्यार्थ्यांनी ती रक्कम बँक खात्यातून काढून ७ दिवसाच्या आत तात्काळ विद्यापीठाच्या लेखा विभागाकडे फी म्हणून जमा करणे कायदेशीररीत्या बंधनकारक आहे.

30/7/2026

डॉ. एस. एस. ओहोळ
अध्यक्ष शिष्यवृत्ती समिती,
सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ पुणे

COEP TECHNOLOGICAL UNIVERSITY
Unitary Public University of Government of Maharashtra

**प्रत** : सर्व संचालक, सर्व विभागप्रमुख, संस्थेचे वेबसाइट.